## थोडक्यात



शरणपूर रोड पोलीस चौकीजवळ वाहतुक पोलीस कर्मचारी प्रात्यक्षिक घेतांना – छाया – लोकमंथन

### जुने नाशिकमध्ये मटका अड्ड्यावर छापा

**नाशिक / प्रतिनिधी**

अमरधामकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोकळ्या जागी मटका खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून जुगाराचे साहित्य व १६० रुपये जप्त केले आहेत. काल दुपारी २ च्या सुमारास जुने नाशिकमध्ये गुमशहा बाबा दर्ग्याजवळ अमरधामकडे जाणाऱ्या मोकळ्या रस्त्यावर अंक आकड्यावर पैसे लावून मटका खेळताना व खेळविताना इसाक मुसा शेख (वय ६०, रा. वडाळा गाव, नाशिक) हा भद्रकाली पोलीस ठाण्याच्या पथकास आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून एक नोटबुक, पेन व १६० रुपये रोख असा ऐवज जप्त केला असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महिलेचा विनयभंग करणाऱ्यास अटक

**नाशिक / प्रतिनिधी**

पैसे देण्याघेण्याच्या कारणातून कुरापत काढून रात्रीच्या वेळी घरात येऊन महिलेचा विनयभंग करणाऱ्या तरुणास पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी महिला ही काल (दि. ७) रात्री घरात झोपलेली असताना आरोपी निखिल अशोक शहा (रा. अयोध्यानगर, संगमनेर) व त्याचा जोडीदार हर्षद कृष्णा केसेकर (रा. श्रीराम कॉलनी, संगमनेर) हे घरी आले. त्यांनी पीडित महिलेच्या सासऱ्यासोबत असलेल्या पैशाच्या देण्याघेण्याच्या कारणावरून कुरापत काढली व महिलेचा हात धरून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन करून तिचा विनयभंग केला, तसेच निखिल शहा याच्या जोडीदाराने महिलेच्या घराच्या खिडकीची काच फोडून नुकसान केले. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार निखिल शहा व हर्षद केसेकर यांच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, केसेकर याला अटक करण्यात आली आहे.

### इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून पडल्याने मजुराचा मृत्यू

**नाशिकरोड / प्रतिनिधी**

खर्जुल मळा येथे एका इमारतीच्या सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी तिसऱ्या मजल्यावरून पडून एका मजुराचा मृत्यू झाल्याचा प्रकार घडला असून, या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. रवींद्र गुलाब खैरनार (रा. बालाजीनगर, मोरे मळा, जेलरोड, नाशिकरोड) हे कदम लॉन्सजवळ सुरू असलेल्या एका इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी काम करत असताना अचानकपणे खाली पडल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मयत घोषित केले. पुढील तपास सुरू आहे.

# ब्रेक फेल झालेल्या एसटी बसने दुचाकीस्वारांना चिरडलं

**नाशिक / प्रतिनिधी**

सिन्नर महामार्गावर एसटी बसने तीन ते चार दुचाकीस्वारांना चिरडल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी दुपारी घडली. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. बसचे ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाला. अपघातानंतर लगेचच बसने पेट घेतला. या महामार्गावर शिंदे पळसे गावाजवळ हा अपघात झाला. ब्रेक फेल झाल्याने बसने दुचाकीस्वारांना चिरडलं. या अपघातानंतर बसने पेट घेतल्याने प्रवाशांनी धावत्या बसमधून उडी मारली.



या अपघातात . या अपघातात दोन दुचाकी स्वारांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यानंतर आता या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या दुचाकी स्वारांची नावे समोर आली आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, या अपघातात होरपळून मृत्युमुखी पडलेल्यांपैकी एकाचे नाव रवींद्र सोमनाथ विसे (३०) तर दुसऱ्याचे नाव मदन दिनकर साबळे (३९) असे असून ते बजाज पल्सर गाडी क्रमांक एमएच १५ सी जे ४८७४ वरून नाशिककडे येत होते. दरम्यान, हे दोघेही युवक नगर जिल्ह्यातील अकोला तालुक्यातील समशेरुपुर येथील रहिवाशी असून ते नाशिकला लग्नासाठी येत असल्याची माहिती समोर आली आहे.

# वादामुळे कर्नाटक महामंडळाची सेवा बंद

**नाशिक / प्रतिनिधी** महाराष्ट्र –कर्नाटक वादाचे पडसाद सार्वजनिक वाहतूक सेवेवर दिसू लागले आहेत. कनार्टक राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसगाड्या काल (ता.६) पासून नाशिकला आलेल्या नाहीत. दुसरीकडे खासगी ट्रॅव्हलर्स कंपन्यांकडून बंगळूरुसह अन्य शहरांसाठी बससेवा कायम सुरु असली तरी बसफेर्या घटविलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागाची गाडी थेट कर्नाटकमध्ये जात नसली तरी कर्नाटक महामंडळाच्या गाड्या मार्ग नाशिकमार्गे धावत असतात. या बसगाड्यांतून बेळगावला जाणाऱ्या प्रवाशांसह कोल्हापूर, पुण्यासाठी प्रवासी प्रवास करत असतात. परंतु गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राज्यांमध्ये निर्माण झालेल्या तणावाचा फटका आता या बससेवेला बसला आहे. काल (ता.६) पहाटे साडेचारला हुबळीकरिता तर आठला बेळगावकरीता अशा दोन बसगाड्या नाशिकहून सुटल्या. नाशिकला मुक्कामी आलेल्या कनार्टक महामंडळाच्या या बसगाड्या होत्या. परंतु दैनंदिन वेळापत्रकानुसार बुधवारी (ता.७) सुटण्यासाठी काल बसगाड्या मुक्कामी येणे अपेक्षित होते. परंतु या बसगाड्याच नाशिकला दाखल न झाल्याने बुधवारी नाशिकहून कनार्टकसाठी बसगाडी सुटली नाही. दोन्ही राज्यांतील वाद निवळेपर्यंत बससेवा ठप्प राहाण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तविण्यात आली आहे. दरम्यान दुसरीकडे खासगी ट्रॅव्हर्सकडून मात्र बंगळूरुकरीता बसगाड्या सोडण्यात येत होत्या. बससेवा प्रभावित झालेली असताना खासगी ट्रॅव्हर्सकडून सेवा पुरविली जात असली तरी तिकिटांच्या दरांमध्ये मात्र वाढ करण्यात आलेली आहे. नाशिकहून बंगळूरुकरीता पंधराशे ते दोन हजार रुपये प्रति प्रवासी असे तिकीट आकारले जात होते. २०० ते ३०० रुपयांची वाढ करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# जिल्हा परिषद व ओपन लिंक्स फाऊंडेशन मध्ये सामंजस्य करार

## जिल्हा परिषद शाळेत होणार विनोबा ॲपचा वापर

**नाशिक / प्रतिनिधी** जिल्हा परिषद व ओपन लिंक्स फाऊंडेशन यांच्या माध्यमातून पुढील काळात जिल्हा परिषदेतील शिक्षकांसाठी विनोबा ऍपचा वापर करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांसाठी ओपन लिंक्स फाऊंडेशनकडून जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांशी निगडित सर्व प्रकारच्या माहितीचे संकलन हे विनोबा नावाच्या ऍप मध्ये करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल ओपन लिंक्स फाऊंडेशन चे संजय दालमिया अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांच्या उपस्थिती सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. शिक्षणाच्या अनुभव बाबतीत शाळेतील ९०% विद्यार्थ्यांवर त्यांच्या शिक्षकांचा प्रभाव असतो. विनोबा हा एक माहिती तंत्रज्ञानावर आधारीत ऍप आहे. भारतामध्ये उच्च गुणवत्तेवर आधारीत घ –१० शिक्षण पध्दती आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. शिक्षकांचा दैनंदिन कामातील वेळ वाचवून शिक्षकांना काही अर्थपूर्ण काम करण्यास वेळ मिळावा व यासाठी आमचा प्रयत्न आहे. विनोबा हे शिक्षकांसाठी एक असे व्यासपीठ आहे ज्यावर शिक्षक त्यांनी केलेले काम इतरांबरोबर शेअर करतात, इतरांच्या पोस्ट्स मधून शिकतात तसेच चांगल्या कामासाठी त्यांचा गौरव देखील केला जातो. शिक्षकांना सोपे व्हावे व त्यांचा वेळ वाचावा म्हणून त्यांना अधिक चांगल्या पद्धतीने शिकवता यावे यासाठी पाठांचे नियोजन, उपक्रम, कार्यपत्रके, नेमुन दिलेली/पूर्ण केलेली कामे (असाइन्मेंट्स ) इथे सहज उपलब्ध होतात. ग्रामीण तसेच शहरी भागातील शाळांमधील शिक्षक त्यांचे काम, जसे – क्लब उपक्रम , प्रकल्प, शिक्षण साधने, वर्गात वापरलेल्या काही नाविन्यपूर्ण गोष्टी, शिक्षकांचे वैशिष्ट्यपूर्ण अनुभव वगैरे इथे सहज शेअर करू शकतात. तुम्ही इतर शिक्षकांनी केलेले काम पाहू शकता, त्याला लाईक करू शकता व त्यातून शिकू शकता. तुम्ही पोस्ट केलेले तुमचे काम क्लस्टर प्रमुख, ब्लॉक प्रमुख तसेच जिल्हास्तरीय पदाधिकारी देखील पहातात. शिक्षकांच्या चांगल्या कामाचे क्लस्टर प्रमुख, ब्लॉक प्रमुख तसेच जिल्हास्तरीय पदाधिकारी यांच्या कडून कौतुक होते. लोकप्रिय होणाऱ्या पोस्ट्स ना :पोस्ट ऑफ द मंथ म्हणून जिल्हा स्तर, ब्लॉक स्तर, क्लस्टर स्तर तसेच शाळा स्तरावर गौरवले जाते. जिल्हा स्तरावर पोस्ट ऑफ द मंथ जिंकणाऱ्या शिक्षकांचा जिल्हा शिक्षण परिषदे मध्ये सत्कार केला जातो. नोव्हेम्बर पर्यंत अश्या २१ पोस्ट्स ना जिल्हास्तरीय पोस्ट ऑफ द मंथ हा गौरव मिळाला आहे. शिक्षकांच्या पोस्ट्स आणि मिळालेले पुरस्कार आपोआपच संग्रहित होतात व पोर्टफोलिओ बनतो. विनोबा या ऍपचा उपयोग एखाद्या कार्यक्रमासंबंधी संवाद साधण्यासाठी तसेच अभिप्राय देण्यासाठी ही केला जातो. जसे निपुण भारत (ऋड्छ) या कार्यक्रमात शैक्षणिक साहित्य वितरित करणे, विविध शैक्षणिक स्तरांवर विद्यार्थ्यांची माहिती जमा करणे, निपुण भारत मध्ये सांगितलेले उपाय वापरून विद्यार्थी व शाळांमधील प्रगतीचा मागोवा घेणे या करता विनोबा ऍपचा उपयोग होतो. शिक्षण परिषदेच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी करता, शाळा सुधार कार्यक्रम, साधन व्यक्ती, आणि शाळा व्यवस्थापन समिती च्या कार्यक्रमासाठी देखील विनोबा हा कार्यक्रम वापरला जातो. आता तो गुणवत्ता सुधार कार्यक्रमासाठी देखील वापरला जात आहे. शिक्षकांचा त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये काही गोष्टी जमवण्यात व देण्यामध्ये खूप वेळ जातो.



**विनोबा ॲपच्या वापराने वाचवता येतो. जसे –**

- शाळेचा पोर्टफोलिओ – शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी केलेलया उपक्रमांनी शाळेचा पोर्टफोलिओ बनतो. विद्यर्थ्यांचे सामाजिक वर्गीकरण करणे – हि माहिती विविध वर्गांकरिता पुन्हा पुन्हा मागितली जाते. – जसे मागास वर्गीय, भटक्या व विमुक्त जमाती, अल्पसंख्याक, दारिद्र्य रेषेच्या खालील मुले, मुली वगैरे यांची माहिती विनोबा मध्ये शिक्षक हि माहिती एका ठिकाणी ठेऊ शकतात व हवे तेव्हा त्यात सुधारणा करू शकतात. यातुन त्यांचा वेळ वाचतो. सर्कल प्रमुख, ब्लॉक प्रमुख येथून त्यांना हवा तो अहवाल काढून घेऊ शकतात. – वारंवार द्यावी लागणारी माहिती जसे पुस्तक वितरण, गणवेश वितरण, पायाभूत सुविधा बद्दल माहिती हे देखील विनोबा कार्यक्रमातून प्राप्त होऊ शकते व शिक्षकांचा वेळ वाचतो.

# घरफोडीतील संशयितास अटक; साडेसहा लाखाचा मुद्देमाल जप्त

**नाशिक / प्रतिनिधी** मुंबई नाका पोलिसांकडून घरफोडीच्या गुन्ह्यातील संशयितास अटक करून साडेसहा लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. घरफोडीचे चार गुन्हे उघडकीस आले आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई नाका पोलिस ठाणे हद्दीत घरफोडीचे प्रमाण वाढले होते. गुन्हे शोध पथक संशयिताच्या शोधात होते. पथकास माहिती मिळाली असता, संशयित रिझवान मलंग शहा (२३, रा. वडाळा नाका) यास ताब्यात घेतले. त्याला पोलिसी खाक्या दाखविल्यानंतर त्याने मुंबई नाका पोलिस ठाणे हद्दीत विविध ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. ४ घरफोड्या करून सोन्याचे दागिने चोरी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी त्याच्याकडून विविध गुन्ह्यातील सुमारे ६ लाख ५५ हजारांचे १३ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले. वरिष्ठ निरीक्षक सुनील रोहकले, निरीक्षक गुन्हे चंद्रकांत अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाचे सहाय्यक निरीक्षक के. टी. रौंदळे, सोमनाथ गेंगजे, कर्मचारी आर. व्ही. सोनार, समीर शेख, अप्पा पानवळ, विश्वास साळुंखे, राजेंद्र नाकोडे यांच्याकडून गुन्ह्यांची उकल करण्यात आली. संशयितास न्यायालयात हजर केले असता, पोलिस कोठडी सुनावण्यात आली. आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात आली आहे.

# राज्य शासनाचे यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार जाहीर

## नाशिकचे पत्रकार सुरेश भटेवरा, विश्वास ठाकूर, प्रकाश शेवाळे यांच्यासह सात जणांचा समावेश



**नाशिक / प्रतिनिधी** राज्य शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार राज्यातील ३४ लेखकांना जाहीर झाला असून, त्यात नाशिकचे सुरेश भटेवरा, विश्वास ठाकूर, प्रकाश शेवाळे यांच्यासह सहा जणांचा समावेश आहे. सन २०२१ साठीचे हे पुरस्कार असून, १ लाख व ५० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नाशिकचे पुरस्कारार्थी असे – सुरेश भटेवरा (शोध नेहरू–गांधी पर्वाचा, प्रौढ वाङ्मय : राज्यशास्त्र/ समाजशास्त्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार १ लाख), विश्वास ठाकूर (नात्याचे सर्व्हिसिंग, प्रथम प्रकाशन : लघुकथा ग. ल. ठोकळ पुरस्कार ५० हजार), प्रा. डॉ. प्रकाश शेवाळे (अनुष्टुभ नियतकालिकाचे वाङ्मयीन योगदान, प्रथम प्रकाशन : समिक्षा सौंदर्यशास्त्र, रा. भा. पाटणकर पुरस्कार ५० हजार रुपये), राजा गायकवाड (गढीवरून, प्रौढ वाङ्मय : विनोद, श्रीपादकृष्ण कोल्हटकर पुरस्कार १ लाख रुपये), सचिन होळकर (शेती : शोध आणि बोध, प्रौढ वाङ्मय : शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय, वसंतराव नाईक पुरस्कार १ लाख रुपये), विवेक उगलमुगले (ओन्ली फॉर चिल्ड्रन, बालवाङ्मय : कविता, बालकवी पुरस्कार ५० हजार रुपये), प्रा. विद्या सुर्वे–बोरसे (कोरा कागद निळी शाई, बालवाङ्मय : संकिर्ण ना. धो. ताम्हणकर पुरस्कार ५० हजार रुपये). नाशिकमधील सहा लेखकांच्या मिळाले आहेत. हा योग पहिल्यांदाच जुळून आल्याने नाशिकच्या साहित्य वर्तुळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पुरस्कारार्थी सुरेश भटेवरा हे ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा साहित्य क्षेत्रातही नावलौकिक आहे. विश्वास ठाकूर हे नाशिकच्या विश्वास बँकेचे संस्थापक अध्यक्ष असून, त्यांनी सहकार व बँकिंग क्षेत्रातील अनुभव या पुस्तकात शब्दबद्ध केले आहेत. प्रा. डॉ. प्रकाश शेवाळे हे त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हरसूल महाविद्यालयाच्या मराठी विभागात सहायक प्राध्यापक आहेत. राजा गायकवाड हे राज्य शासनाच्या वस्तू व सेवाकर विभागात उपआयुक्त म्हणून नाशिकमध्ये कार्यरत आहेत. त्यांचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. सचिन होळकर हे लासलगावस्थित असून, ते सातत्याने कृषीविषयक लेखन करीत असतात. विवेक उगलमुगले हे कवी, साहित्यिक असून, ते नाशिकमध्ये जलसंपदा विभागात सेवाव्रत आहे. तर प्रा. विद्या सुर्वे– बोरसे या महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या व्यंकटराव हिरे पंचवटी महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून अध्यापन कार्य करतात.

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24–परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** नाशिक

L&T Financial Services

## तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई–लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई–लिलाव करीत आहेत.

| कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 01.12.2022 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. अनिता अनिल जोशी<br>2. अनिल सीताराम जोशी<br>3. अनिकेत अनिल जोशी | मालमत्तेचा पत्ता : फ्लॅट क्र. 501, 5वा मजला, बी विंग, स्काय एलिगन्स, प्लॉट क्र. 17 ते 21 आणि 23, एस क्र. 206/ए1+206/बी/2, बीएच रीलायन्स पेट्रोल पंप, ओंकार बंगल्याजवळ, किशोर सूर्यवंशी मार, दिंडोरी रोड, म्हसरुळ शिवार, नाशिक, महाराष्ट्र आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध –<br>पूर्व – बी विंग मधील पॅसेज आणि फ्लॅट क्र. 504<br>पश्चिम – साइड मार्जिन आणि ए विंग<br>उत्तर – बी विंग मधील फ्लॅट क्र. 502<br>दक्षिण – साइड मार्जिन | NSKHL17000239 | 23.09.2022 | रु. 2,32,525.9 | रु. 45,77,354.20 | रु. 23,25,259/– | 23/12/2022 | 28/12/2022 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. ही ई–लिलाव विक्री अधिकृत अधिकाऱ्याद्वारे सार्वजनिक ई–लिलावाच्या पद्धतीच्या मदतीने सरफेसी कायद्याच्या तरतुदींखाली करण्यात येत आहे.
2. हा सार्वजनिक ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **23/12/2022.** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावात यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई–लिलावाच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे ई–लिलावाच्या तारखेला म्हणजे **28/12/2022** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **29/12/2022** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शांताराम शेणॉय, मोबाईल +91 9822989925 पत्ता : एल अँड टी फायनान्स लि. – ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे – 411 005 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॅट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा एसएआरएफएईएसआय कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 09.12.2022
**ठिकाण:** नाशिक

स्वाक्षरी/–
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य संपादक** अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, प्लॉट नं. ६०, भूषण नगर, केडगाव देवी, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथून छापून शॉप नं. २, तिसरा मजला, बळवंत प्लाझा, वकील वाडी, हॉटेल पंचवटीच्यासमोर, नाशिक - १, पिन - ४२२००१ येथे प्रकाशित केले. ✻ **व्यवस्थापकीय संपादक** - रंजन साळवी. फोन नं. (०२५३) २३१०६०० RNI : MAHMAR/2011/41224. EMAIL : lokmanthan.nashik2498@gmail.com (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.)